# भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अरुणा असफ अली यांचे योगदान

**कु. तृप्ती कुंभार**
बी.ए. भाग.-I
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

**घोषवारा:**

भारताला स्वातंत्र्य देण्यासाठी अनेकानी बलिदान दिले आहे. यामध्ये अबाल वृद्ध, स्त्रियां, कामगार, शेतकरी, कष्टकरी व स्वातंत्र्यसैनिकांचा समावेश होता. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील पुरुषांचा सहभाग मोठा असला तरी त्यात महिलादेखील मागे नव्हत्या. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महिलांचे मोठे योगदान आहे. त्यांनी आपले घर कुटुंब ही जबाबदारी सांभाळताना स्वातंत्र्यलढ्यातही सहभाग नोंदवला. ज्यांनी पुरुषांच्या खांदयाला खांदा लावून लढा दिला, त्रास सहन केला. त्या महिलाचे योगदान तर आता विस्मृतीत चालले आहे. त्यातीलच एक भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारी महिला, छोडो भारत आंदोलनातील वीरागंना आणि भारतरत्न पुरस्काराच्या मानकरी असणाऱ्या अरुणा असफ अली यांना प्रस्तुत शोधनिबंधातून समजावून घेण्याचा हा छोटासा प्रयत्न.

**कळीचे मुद्दे:** स्वातंत्र्य, बलिदान, कामगार, शेतकरी, कष्टकरी, स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारी, वीरागंना

**प्रस्तावना:**

अरुणा असफ अली यांचा जन्म १६ जुलै १९०९ रोजी पंजाबमधील कालका शहरात एका श्रीमंत बंगाली ब्राम्हण कुटुंबात झाला. अरुणा उपेंद्रनाथ गांगुली असे त्यांचे पूर्वीचे नाव होते. त्या स्वतंत्रपणे विचार करण्याऱ्या होत्या. डोळयांवर झापडं लाऊन पारंपरिक मार्गाने वाटचाल करणं हे त्यांना मान्य नव्हतं म्हणून त्यांनी आई वडिलांच्या इच्छयेच्या विरुद्ध प्रथम लाहोरच्या ख्रीस्ती मिशनरी शाळेत व नंतर नैनितालच्या शिक्षण संस्थेत त्यांनी शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी कलकत्याच्या गोखले कन्या पाठशाळेत अध्यापनाचे काम केले. वयाच्या १९ वर्षी त्यांनी आपल्यापेक्षा वयाने 23 वर्षे मोठे असलेल्या सुप्रसिद्ध मुस्लिम वकील असफ अली यांच्याशी आंतरधर्मीय विवाह केला. विवाहानंतर अरुणा आपल्या पतीबरोबर युरोप, अमेरिका, सोव्हिएत युनियन, मेक्सिको या दिशांचा दौरा केला. युनेस्कोसाठी गेलेल्या भारतीय शिष्टमंडळात त्यांचा समावेश होता. असफ अली हे काँग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यामुळे अरुणा यांचा संबंध भारतीय स्वातंत्र्यलढ्याशी आला.

**स्वातंत्र्यलढ्यातील कार्य :**

अरुणा असफ अली यांनी १९३० ते १९३२ या काळात कायदेभंग चळवळीत तसेच १९४१ मध्ये वैयक्तिक सत्याग्रहात सहभाग घेतला. त्यासाठी त्यांनी तुरुंगवासही भोगला महात्मा गांधी, मौलाना आझाद, जयप्रकाश नारायण, अच्युत पटवर्धन, राममनोहर लोहिया यांच्या विचारांचा त्यांचावर प्रभाव होता व त्यांच्याबरोबर त्या सभा, प्रभातफेऱ्या यांमध्ये सहभागी झाल्या. १९३० पासून ते आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी खादीचे कपडे वापरले. महात्मा गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहावेळी मीठ, मिरवणुका काढणे आणि सभा भरविणे हे काम त्यांनी सर्वत्र केले. ब्रिटीश सरकारने त्यांच्यावर खटला भरला व त्यांना एक वर्षाची कारावासाची शिक्षा सुनावली.

छोडो भारत आंदोलनामुळे त्यांच्या आयुष्यास वेगळे वळण मिळाले. ८ ऑगस्ट १९४२ रोजी अखिल भारतीय काँग्रेस महासमितीचे अधिवेशन मुंबईला गवालिया टँक मैदानावर आयोजित केले होते. अशा वेळी पोलिसांच्या वेढ्याला विरोध करून अरुणा यांनी ध्वजस्तंभावर तिरंगा फडकाविला. ऑगस्ट क्रांतीदिनाच्या त्या वीरंगाना ठरल्या. चळवळीला मदत करण्याच्या उद्देशाने चार वर्षे १९४६ पर्यंत त्या भूमिगत कार्यरत राहिल्या. दिल्लीतील भूमिगत चळवळीच्या त्या प्रमुख नेत्या होत्या. स्वातंत्र्योत्तर काळात १९४८ साली त्या युनेस्कोच्या मेक्सिको येथील परिषदेत डॉ. रामकृष्णन यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाच्या सदस्य म्हणून गेल्या.

राममनोहर लोहिया यांच्यासोबत काँग्रेसच्या इन्किलाब या नियतकालिकाचे संपादन अरुणाजी करत असत. त्यांना अटक करणे हे सरकारपुढे एक आव्हान होते त्यामुळे अटकेसाठी सरकारने पाच हजार रुपयांचे बक्षिस जाहीर केले. पुढे त्यांच्यावरील वॉरंट रद्द झाले.

अरुणा १९४७ मध्ये दिल्ली प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्ष म्हणून निवडून आल्या. दिल्लीमध्ये काँग्रेस संघटना बळकट करण्याचे काम त्यांनी केले. सन १९४८ मध्ये त्यांनी समाजवादी पक्षात प्रवेश केला, लगेचच दोन वर्षांनी समाजवादी पक्ष सोडून त्यांनी सहकाऱ्याच्या मदतीने डावा समाजवादी पक्ष निर्माण केला. पुढे हा पक्ष कम्युनिस्ट पार्टीमध्ये सामील झाला. अरुणा या पक्षाच्या केंद्रिय समितीच्या सदस्य आणि अखिल भारतीय कामगार संघटनेच्या उपाध्यक्ष झाल्या.

गांधी-आयर्विन करारानुसार अनेक राजकीय कैद्यांना सोडून दिले होते. पण अरुणा यांना मात्र सोडण्यात आले नाही. त्यांची एवढी भीती इंग्रज सरकारने घेतली होती. त्यांना सोडले नाही म्हणून जनतेने प्रखर आंदोलने सुरू केली. या आंदोलनामुळे काही दिवसांनी त्यांची सुटका झाली पण १९३२ मध्ये त्यांना पुन्हा अटक करून तिहार जेलमध्ये ठेवले व दोन हजार रुपयांचा दंडही सूनवला.थोडक्यात काय तर १९३० ते १९४१ या कालखंडात अटक, कारावास व सुटका या गोष्टी सतत चालू होत्या.‘नुसते तुरंग भरून स्वातंत्र्य मिळेल’ ही गोष्ट पटेनाशी झाल्याने १९४२ मध्ये महात्मा गांधींनी इंग्रजांना ‘भारत छोडो’ हा इशारा दिला. अरुणा यांनी त्यांना पकडायला आलेल्या पोलिसांच्या हातावर तुरी देऊन त्या चार वर्ष भूमिगत राहिल्या.

अरुणा दिल्लीच्या पहिल्या महापौर झाल्या. लिंक हे साप्ताहिक त्यांनी सुरू केले. त्यांनी पुन्हा काँग्रेस पक्षात प्रवेश केला. अमेरिकेत भारताच्या राजदूत म्हणुनही त्यांनी कार्ये केले. दिल्लीतून प्रकाशित होणाच्या पेट्रिऑट या इंग्रजी दैनिकांशी त्या शेवटपर्यंत जोडल्या होत्या. ‘इंडो सोव्हिएत कल्चरल सोसायटी’, ‘ऑल इंडिया पीस कौन्सिल’, ‘नॅशनल फेडरेशन ऑफ इंडियन वुमेन’ इत्यादी सामाजिक संस्थाशी त्या संबंधित होत्या. साधी राहणी समाजवादी विचारसरणी आणि निर्भयता हे त्यांच्या व्यक्ति मत्त्वाचे गुणविशेष होते. त्यांच्या ट्रॅव्हल टॉक या ग्रंथाला लिहलेल्या प्रस्तावनेत पंडित नेहरू त्यांचे वर्णन करताना म्हणतात, ‘अरुणा’ हे एक अस्वस्थ आणि दुसऱ्यांना अस्वस्थ करणारे व्यक्तिमत्त्व आहे.सत्याग्रहात सहभागी झाल्या म्हणून त्यांना तुरुंगात देखील जावे लागले. यावेळी त्यांनी एक निश्चय केला की आता आयुष्याच्या शेवटपर्यंत अंगावर खादीचे कपडे घालायचे आणि त्यांनी तो निश्चय तसाच पाळला.त्यानंतर पुढे काही दिवसांतच गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहाची हाक दिली. आणि मग अरुणा यांनी या सत्याग्रहात मोठ्या हिरहिरीने सहभाग नोंदवला. आणि हळूहळू मग अरुणा सत्याग्रहात सक्रिय होऊ लागल्या.

**समारोप-**

२९ जुलै १९९६ रोजी दिल्ली येथे त्यांचे निधन झाले. अरुणा यांना अनेक मानसन्मान मिळले सोव्हिपत लँड नेहरू पारितोषिक (१९५५), लेनिन शांतता पुरस्कार (१९७५), आंतरराष्ट्रीय सामंजस्याचा ‘जवाहरलाल नेहरू पुरस्कार (१९९१)’ आदी सन्मान त्यांना मिळाले भारत सरकारने १९९२ मध्ये त्यांना ‘पद्मविभूषण’ तसेच सर्वोच्च असा ‘भारतरत्न’ पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला (१९९७). भारतीय टपाल खात्याने त्यांच्या छायाचित्राचे टपाल काढून त्यांच्या कार्याचा सन्मान केला (१९९८). अशाप्रकारे अरुणा असफ अली यांनी आपले संपूर्ण आयुष्य भारताच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी समर्पण केले.

**संदर्भ –**

१. डिखोळकर, मनीषा, संपा मोदी, नवाझ ‘अरुणा असफ अली’ –‘भारतमातेची धाडसी कन्या’, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील – स्त्रिया, पुणे, 2003

२. गव्हाणे, किशोरकुमार आणि इतर, भारतीय राष्ट्रीय चळवळींचा इतिहास औरंगाबाद, २०१५.

३. कवि, माधवी, साठ महामानव, लातूर, २०१०.

४. डॉ. बी. आर. बारड (२०१६), भारत के महान क्रांतिकारी, रावत प्रकाशन, दिल्ली.

५. खडपेकर विनया (१९९१), स्त्री स्वातंत्र्यवादिनी , विसाव्या शतकातील परिवर्तन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.